**फौजदारी चौकशी अर्ज क्र. १६५/२०२२**

प्रभाकर दळवी वि. गट ग्रामपंचायत धामणसई वगैरे.

CNR No. MHRG090007682022

## नि.क्र.१ वरील आदेश

०१. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ च्या कलम १३ अन्वये त्याच्या आजीच्या मृत्यू नोंदीसाठी दाखल केला.

०२. अर्जदाराचे कथन असे आहे की, त्याची आजी नामे **जिजाबाई धोंडू दळवी** हिचा मृत्यू **दि.१४/०४/१९८७** रोजी झाला. तिच्या मृत्यूची नोंद एक वर्षाच्या आत जन्म मृत्यू रजिस्टरमध्ये केली नसल्याने अर्जदाराने प्रस्तूतचा अर्ज दाखल केला.

०३. गैरअर्जदारांना नोटीसची बजावणी केली असता गैरअर्जदार क्र.०१ यांनी त्यांचे म्हणणे (नि.क्र.०८) अन्वये अभिलेखात मृत्यू घटनेची नोंद करण्यात आली नाही तसेच गैरअर्जदार क्र.०२ व ०३ यांनी त्यांचे म्हणणे (नि.क्र. १० व ११) अन्वये मृत्यू घटनेची नोंदवही उपलब्ध नसल्याने अर्जदाराच्या आजीची मृत्यू नोंद करून घेण्यास त्यांची काहीही हरकत नसल्याचे कळविले.

०४. प्रस्तुत अर्जाच्या अनुशंगाने अर्जदाराने स्वतःचे शपथपत्र (नि.क्र.१४) व साक्षीदार नथुराम पांडुरंग बामुगडे यांचे शपथपत्र (नि.क्र.२२) अभिलेखावर दाखल करून अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली. त्याचप्रमाणे अर्जदाराने आजीचे मृत्यू नोंद उपलब्ध नसल्याबाबत दाखल्याच्या अस्सल प्रती (नि.क्र.१५ ते १७), स्वतःचे आधारकार्ड ओळखपत्र पडताळलेली प्रत (नि.क्र.१८), मौजे सोनगाव फेरफार क्र.६११ ची सहिशिक्क्याची प्रत (नि.क्र.१९), मौजे सोनगाव स.क्र.१४ ची सातबारा उताऱ्याची सहिशिक्क्याची प्रत (नि.क्र.२०) व ''दैनिक सागर'' मध्ये प्रसिद्ध झालेला जाहिरनामा (नि.क्र.२१) हे दस्त दाखल केले आहेत. अर्जदाराने नि.क्र.२३ वर पुरसीस दाखल करून पुरावा बंद केला.

०५. अर्जदाराने प्रस्तूत अर्जामध्ये दाखल केलेल्या तोंडी व लेखी पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदाराची आजी **जिजाबाई धोंडू साळवी** यांचा मृत्यू **दि.१४/०४/१९८७** रोजी झाला व त्याबाबतची नोंद जन्म–मृत्यू नोंद वहित करण्यात आल्याचे आढळून येत नाही. अर्जदार व साक्षीदार नथुराम पांडुरंग बामुगडे यांनी शपथेवर दिलेल्या पुराव्यावर अविश्वास दाखविण्याचे कुठलेही कारण दिसून येत नाही. त्याचप्रमाणे 'दैनिक सागर' या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेला जाहिरनामा (नि.क्र.२१) प्रसिद्ध करण्यात येवून देखील कुठलाही आक्षेप कुणीही नोंदविला नाही. सबब, जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३(३)प्रमाणे मृत्यू नोंदीच्या कार्यवाही संदर्भात आदेश करण्याचे अधिकार हे न्यायदंडाधिकारी यांचे कार्यक्षेत्रात येत असल्याने अशी नोंद करण्याचा आदेश करणे क्रमप्राप्त ठरते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. **सचिव/निबंधक, जन्म–मृत्यू नोंद विभाग, गट ग्रामपंचायत धामणसई, ता. रोहा, जिल्हा– रायगड** यांनी अर्जदाराची आजी **जिजाबाई धोंडू दळवी** यांचा मृत्यू **दि.१४/०४/१९८७** रोजी झाला असल्याबाबत नोंद संबंधीत जन्म–मृत्यू नोंदवहीत नियमाप्रमाणे योग्य ती शुल्क आकारणी करून करावी व तसा दाखला अर्जदार यांना द्यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2023.01.19 18:04:24 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)

दि. १९.०१.२०२३ न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word to word as per the original Judgment or Order.

| | |
|---|---|
| Name of the stenographer | :- S. G. Padwal, Grade -III. |
| Name of the Court | :- C.J.J.D. & J.M.F.C. Roha, |
| Judgment / Order dictated on | :- 19/01/2023. |
| Judgment / Order delivered on | :- 19/01/2023. |
| Judgment / Order signed on | :- 19/01/2023. |
| Judgment / Order uploaded on | :- 19/01/2023. |